नि.फौ.ख.क्र.३९/२०१९
निशाणी २९

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ६ यांची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नांव– विठ्ठल वसंत धुरी
वय – ४३ वर्षे, व्यवसाय – नोकरी, हुद्दा–पो.हे.कॉ.
नेमणूक–जिल्हा वाहतूक शाखा सिंधुदुर्ग, जि. सिंधुदुर्ग.

**सरतपास सहायक सरकारी वकील श्रीमती. व्ही.व्ही.ठाकूर यांच्यामार्फत सुरु–**

**०१.** माझी मे २०१८ ते डिसेंबर २०२४ या कालावधीमध्ये वेंगुर्ला पोलीस स्टेशन येथे नेमणूक होती. गुन्हा क्रमांक १०७/२०१८ या गुन्ह्याच्या तपासामध्ये मी गुन्ह्यातील मुद्देमाल एक सिंगल बॅरेलची बंदुक त्याची लांबी ४ फूट ६ इंच अशी होती ती न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा कलिना सांताक्रुझ मुंबई येथे तपासणीकरीता घेवून गेलो होतो. दि. ११/१२/२०१८ रोजीच्या वेंगुर्ला पोलीस ठाणे यांचे जावक क्रमांक ३७१५/२०१८ च्या पत्रासोबत मी सदरचा मुद्देमाल घेवून गेलो होतो. सदरचा मुद्देमाल जमा केल्यानंतर मी संबंधीत लिपीक यांची त्यावर पोहोच घेतली होती. (साक्षीदाराला दि. ११/१२/२०१८ रोजीचे पत्र दाखविण्यात आले.) हे तेच आहे. त्यावर तपासिक अंमलदार यांची सही असून न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा येथील लिपीक यांची सही व शिक्का असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (सदर पत्रास **निशाणी –३०** देण्यात येते.)

**०२.** तपासणी झाल्यानंतर सदरचा मुद्देमाल मी आणण्याकरीता मुंबई येथे दि. १४/०१/२०१९ रोजी गेलो होतो. त्यासंदर्भाने जावक क्रमांक १३०/२०१९ अन्वये दि. १४/०१/२०१९ रोजी मला पत्र देण्यात आले होते. (साक्षीदाराला दि. १४/०१/२०१९ रोजीचे पत्र दाखविण्यात आले.) हे तेच आहे. त्यावर तपासिक अंमलदार यांची सही असून न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा येथील लिपीक यांची सही व शिक्का असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (सदर पत्राच्या कार्बन प्रतीस **निशाणी –३१** देण्यात येते.) सदर पत्रास अनुसरुन मुद्देमाल व तपासणी अहवाल माझ्या ताब्यात देण्यात आला. सदरचा अहवाल व मुद्देमाल मी पोलीस स्टेशनला दि.२२/०१/२०१९ रोजी जमा केला व त्याअनुषंगाने माझा जबाब

नोंदविण्यात आला. (साक्षीदाराला मुद्देमाल दाखविण्यात आला.) सदर मुद्देमालावर लेबल असून सदरचे लेबल हे मी घेवून गेलेल्या मुद्देमालावरील आहे. मी सदर लेबल पाहून सांगतो की सदरचा मुद्देमाल मी तपासणीकरीता घेवून गेलो होतो.

<u>सरतपास पूर्ण.</u>

<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.बी.एन.प्रभू यांचेतर्फे सुरु –</u>

०३. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस अधिकारी हे मुख्यालय सोडताना त्यासंदर्भाने ठाणे प्रमुख यांनी आदेश देणे आवश्यक आहे. हे म्हणणे खरे आहे की, ठाणे प्रमुख यांच्या आदेशानंतर नियमितपणे ठेवण्यात आलेल्या हालचाल रजिस्टरवर त्याबाबतची नोंद केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबतची नोंद ठाणे दैनंदिन रजिस्टरमध्ये देखील केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, ठाणे प्रमुख यांच्या आदेशाशिवाय एखादा अधिकारी मुख्यालय सोडून बाहेर गेल्यास त्यास प्रवास भत्ता व आहार भत्ता मिळत नाही. मला मुद्देमाल तपासणी करीता घेवून जाण्याकरीता ठाणे प्रमुख यांनी तोंडी आदेश दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्याही कार्यालयीन आदेश हा लेखी स्वरुपात दिला जातो. हे म्हणणे खरे आहे की, ठाणे प्रमुखांनी मला प्रयोगशाळेत मुद्देमाल घेवून जाण्याबाबत कोणताही लेखी आदेश दिला नव्हता. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, आम्हाला एक दिवस पुर्वी कामाचे स्वरुप नेमून दिले जाते त्यामुळे आम्हाला स्वतंत्र असा कोणताही आदेश दिला जात नाही. हे म्हणणे खरे नाही की, डयुटी बटवडा रजिस्टर यावर ठाणे अंमलदार यांची सही असते. हे म्हणणे खरे नाही की मी प्रस्तुत कामातील मुद्देमाल घेवून न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा कलिना सांताक्रुझ मुंबई येथे गेलो नव्हतो.

(आरोपी यांच्या वकिलांची तब्येत ठिक नसल्याने त्यांच्या तोंडी विनंतीवरुन साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.)

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/–
(एस.जे.चिवटे)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.

दिनांक– ०९/०७/२०२५